सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पीत तरतूदीचे वितरण करणेबाबत..

"महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास नाफेडमार्फत खरेदी केलेल्या शेतमालाची रक्कम अदा करण्याकरिता येणा-या अनुषंगीक खर्चासाठी अर्थसहाय्य" (२४२५ २४१७)

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र.सपस-२०१७/प्र.क्र. २१५/२४ स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, वित्त विभाग,
क्र.शाहमी २०१६/सपविवि/प्र.का.३/अर्थबळ, दिनांक ८.९.२०१६
२) शासन निर्णय, वित्त विभाग,
क्र. शाहमी २०१७/सपविवि/प्र.का.१३/अर्थबळ दिनांक २३.१.२०१७
३) शासन निर्णय, वित्त विभाग,
क्र. शाहमी २०१७/सपविवि/प्र.का.४२/अर्थबळ दिनांक ३.६.२०१७६
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग,
क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग,
क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थसंकल्प-३, दिनांक २९.१२.२०१७
६) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/१७-स, दिनांक १.१.२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

सन २०१३-१४ मध्ये केंद्र शासनाने आधारभूत दराने विविध कडधान्ये, तृणधान्य व तेलबिया यांची खरेदी करण्यासाठी नाफेड या संस्थेची प्रमुख अभिकर्ता म्हणून नेमणूक केली आहे. राज्यात सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई या संस्थेची उप अभिकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ३१.७.२०१४ रोजीच्या आधारभूत किंमत योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार नाफेडच्या वतीने खरेदी केलेल्या शेतमालाचे चुकारे शेतकऱ्यांना विहीत कालावधीत (३ दिवसांत) अदा करणे आवश्यक आहे. तथापि, नाफेडकडून शेतमालाची रक्कम उशिरा प्राप्त होत असल्याने शेतक-यांचे चुकारे जलद गतीने अदा करण्यासाठी पणन महासंघास वित्त विभागाकडून शासन हमी मंजूर करण्यात येते. सदर

शासन हमीच्या आधारे पणन महासंघास राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन शेतकऱ्यांचे चुकारे अदा करणे सुलभ होते.

हंगाम २०१६-१७ करिता शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याकरिता पणन महासंघास वित्त विभागाने शासन निर्णय, दिनांक ८/९/२०१६, दिनांक २३/१/२०१७ व दिनांक ३/६/२०१७ अन्वये अनु. रु. १० कोटी , रु. १०० कोटी व रु. २०० कोटीची शासन हमी मंजूर केलेली आहे.

पणन महासंघास वेळोवेळी मंजूर केलेल्या विविध शासन हमीचे एकूण १४६.६३ लाख हमीशुल्क पणन महासंघाने भारतीय रिझर्व्ह बँकेत जमा केले आहेत. सदर हमीशुल्काची रक्कम पणन महासंघास उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये रु.१४६.६३ लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे. सदर हमीशुल्काची रक्कम पणन महासंघास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

हंगाम २०१६-१७ करिता किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत नाफेडच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाने खरेदी केलेल्या शेतमालाची रक्कम अदा करण्याकरिता येणा-या अनुषंगिक खर्चासाठी पणन महासंघास रु.१,४६,६३,०००/- (रुपये एक कोटी सेहेचाळीस लाख त्रेसष्ट हजार फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च सन २०१७-१८ च्या खालील लेखाशिर्षाखालील पुरवणी मागणीद्वारे मंजूर केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा:-

मागणी क्रमांक व्ही-२

२४२५ सहकार,

(००) (१०८), इतर सहकारी संस्थांना सहाय्य

(०१) पणन सहकारी संस्था,

(०१) (२२) म.रा.स.पणन महासंघास नाफेडमार्फत खरेदी केलेल्या शेतमालाची रक्कम अदा करण्याकरिता येणा-या अनुषंगीक खर्चासाठी अर्थसहाय्य **(२४२५ २४१७)**

३३ - अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या अर्थसहाय्याचा विनियोग ज्या कारणास्तव मंजूर केला आहे, त्याच कारणासाठी वापर करुन संबंधित महासंघाने त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल विनाविलंब शासनास सादर करावा.

४. या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेला रु. रु.१,४६,६३,०००/- "रुपये एक कोटी सेहेचाळीस लाख त्रेसष्ट हजार फक्त) इतकी रक्कम RTGS सुविधेद्वारे महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास अदा करावी. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

मागणीदार/पुरवठादार/कंत्राटदाराचे नाव/फर्मचे नाव	महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मर्या. मुंबई
कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी लागू आहे)	कनमूर हाऊस, नरसीनाथा स्ट्रीट, पो.बॉ.क्र ५०८०, मस्जीद, मुंबई-९
बँक खाते क्रमांक	६२४२९१८३२९
बँक खात्याचा प्रकार	चालू खाते.
बँकेचे नाव	इंडियन बँक
बँक शाखेचे नाव व पत्ता	शाखा मांडवी, मस्जीद
बँक शाखेचा संकेतांक	०००१६
एमआयसीआर क्रमांक	४०००१९०१६
आयएफएससी संकेतांक	IDIBOOOMO13

५. या शासन निर्णयातील मंजूर करण्यात आलेल्या रकमेचे आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्यासाठी श्री.र.गं.बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोख शाखा),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी व श्री.का.गो.वळवी, उप सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित बँका / वित्तीय संस्थांना वितरीत करताना आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रकम प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची प्रत शासनास सादर करावी.

७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ व दि. ३०.६.२०१७ अन्वये उपरोक्त बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून, सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ परिच्छेद या योजनेस लागु नाहीत. तसेच दिनांक १८.४.२०१७ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व संबंधित बाबींची पूर्तता होत आहे.

८. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. २५/१८/ व्यय-२, दिनांक २७/१/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा २०१८०२०८१३०३१४६६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunanda M Ghadyale

Digitally signed by Sunanda M Ghadyale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9edecaf650dad6e8311b45, serialNumber=c5adff2513f33afa9ed70c79c5a4636204d8bb4040bf2c6c2470d0f20d8dc79d, cn=Sunanda M Ghadyale
Date: 2018.02.08 13:10:39 +05'30'

(सुनंदा मो.घड्याळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) महालेखाकार, महाराष्ट्र- १,(लेखा व अनुज्ञेयता),(लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर.
२) प्रधान सचिव(पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
३) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,मुंबई-९
४) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,पुणे
५) पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे
६) अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई
७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
८) सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,मंत्रायल,मुंबई
९) मा.मंत्री(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१०) मा.राज्य मंत्री(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
११) वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प -३ व १३ ,मंत्रालय, मुंबई
१२) अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) कार्यासन अधिकारी,(रोख शाखा)सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई (३ प्रती)
१४) निवड नस्ती (२४स).